# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO


**(असाधारण)**

मंगळवार, दिनांक ५ मे, २०१५

अधिसूचना

क्र. ४०/२०१५ दि. ५.५.२०१५

**विषय : अधिसभा निवडणूक २०१५**
**नोंदणीकृत पदवीधर (Registered graduate) म्हणून नांव नोंदणीबाबत**
**संदर्भ : असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१५, दि. ६.४.२०१५**

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता कळविण्यात येते की, संदर्भांकित असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१५ अन्वये नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणी प्रक्रिया Online पद्धतीने सुरू आहे. ही प्रक्रिया दि. ८.४.२०१५ ते ७.५.२०१५ या कालावधीपर्यंत सुरू राहणार असून त्यानंतर ती बंद होणार आहे.

दिनांक ७.५.२०१५ रोजीपर्यंत नोंदणी केलेल्या अर्जांची हार्डकॉपी काढून शेवटच्या दिवशी म्हणजेच दिनांक ७.५.२०१५ ला कार्यालयीन वेळेत विद्यापीठात जमा करण्याबाबतसुद्धा कळविण्यात आले होते. परंतू, दि.७.५.२०१५ ला ऑनलाईन अर्ज भरल्यावर प्रिंट काढून आवश्यक फी भरून अर्ज विद्यापीठात सादर करता यावे याकरीता, त्यामध्ये एक दिवसाची वाढ करण्यात येत असून, दिनांक ७.५.२०१५ पर्यंत Online पद्धतीने भरलेले सर्व अर्ज, आवश्यक असलेल्या कागदपत्र व शुल्कासह आता दि. ८.५.२०१५ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या आवकशाखेत स्विकारण्यात येतील.

तसेच उल्लेखीत दिनांकापर्यंत नोंदणी केलेले अर्ज आवश्यक असलेल्या कागदपत्र व धनाकर्षासह पोस्टामार्फत पाठविण्यात आले असतील, तर ते दिनांक ११.५.२०१५ पर्यंत स्विकारण्यात येतील. सदर मुदतीमध्ये यानंतर कुठल्याही प्रकारची वाढ केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO

गुरूवार, दिनांक ७ मे, २०१५

## अधिसूचना

क्र. ४१/२०१५ दि. ७.५.२०१५

**विषय : अधिसभा निवडणूक २०१५**
**नोंदणीकृत पदवीधर (Registered graduate) म्हणून नांव नोंदणीबाबत**
**संदर्भ : १) असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१५, दि. ६.४.२०१५**
**२) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०१५, दि. ५.५.२०१५**

संदर्भांकित असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१५ अन्वये पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणीसाठी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in. या संकेतस्थळावर Online पद्धतीने, विहित केलेल्या नमुना अर्ज Appendix-1 मध्ये दि. ८.४.२०१५ ते ७.५.२०१५ या कालावधीत मागविण्यात आले होते. तद्वतच, असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०१५ अन्वये दि.७.५.२०१५ ला ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर संगणक प्रत विहित शुल्कासह विद्यापीठात सादर करता यावी याकरीता दि. ८.५.२०१५ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता कळविण्यात येते की, सदहू अधिसूचनेद्वारे, उपरोक्त अर्ज भरण्याच्या तिथीला मुदतवाढ प्रदान करण्यात येत आहे. तसेच, पदवीधरांना नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणीसाठी Online आणि Offline ह्या दोन्ही पद्धती उपलब्ध करून देण्यात येत आहेत. Offline करिता अर्जाचा विहित नमुना Appendix-1 विद्यापीठ कार्यालय येथे विनामुल्य उपलब्ध होवू शकेल. Online आणि Offline पद्धतीने इच्छुक पदवीधारकांनी आपले विहित अर्ज आवश्यक दस्ताऐवज व धनाकर्ष / रोखीने सादर करण्याची अंतिम तिथी दि. २२.५.२०१५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आलेली आहे. दि.२२.५.२०१५ पर्यंत Online पद्धतीने भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक दस्ताऐवज व शुल्कासह संबंधितांनी दि. २३.५.२०१५ ला दुपारी ३.०० वा.पर्यंत विद्यापीठ कार्यालयाच्या आवक शाखेत जमा करावी.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी